**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील विविध शासकीय / अशासकीय अनुदानीत व विना अनुदानीत संस्थांमधील प्रवेश क्षमतेमध्ये झालेले बदल, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेले अभ्यासक्रम पुढे चालू ठेवणे, इ. मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२००९/(१९८/१०)/तांशि-५,**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक :- ३० जुन, २०१०.**

**संदर्भ :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचे क्र.एफ नं.२२-२७२६/२००८/(३१०)/टिएमडीई-२७२६,दि.१९ जुन,२०१०चे पत्र.**

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ करिता सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या एकूण १३० शासकीय/अशासकीय अनुदानित, विना अनुदानित तंत्रनिकेतनांमधील प्रवेशक्षमतेमध्ये झालेले बदल, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, इत्यादीमध्ये झालेली अतिरिक्त प्रवेश क्षमता आणि अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयाद्वारे सोबतच्या विवरणपत्र अ मधील स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या संस्थांना स्तंभ ३ व ५ मध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेसह खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ करीता प्रवेश क्षमतेमध्ये झालेले बदल, नवीन अभ्यासक्रम सुरु करणे आणि अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

१) शासकीय तंत्र निकेतनाव्यतिरीक्त उर्वरित सर्व संस्थांना वरील नवीन अभ्यासक्रम / प्रवेश क्षमतेस मान्यता कायम विना अनुदानीत तत्वावर राहिल.

२) सदर अभ्यासक्रमांसाठी संस्थेची प्रवेशक्षमता सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दर्शविलेल्या स्तंभ ५ व ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टीईएम ३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१(अ),दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना अनुदान तंत्र शिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४) सर्व संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते, इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५) ज्या अशासकीय अनुदानीत संस्थेकरीता तीन किंवा त्यापेक्षा जास्त विना अनुदानीत तत्वावर अभ्यासक्रमास शासनाने मान्यता दिली आहे. सदर संस्थेने विना अनुदानीत अभ्यासक्रम शाखेकरीता स्वतंत्र प्राचार्य, शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचारी नेमावे व आवश्यक ती यंत्रसामुग्री, सोयीसुविधा स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देणे अनिवार्य असेल.

६) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या समतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

७) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नता घेणे आवश्यक आहे.

**True Copy**

ROTA | H 1554 (300-7-2010)
D:\S O I e Sadmission doc 24.16 declaration latest new course 2010 doc

Principal
A. G. Patil Polytechnic Institute
Solapur.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

९) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०) सदर पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

११) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

१२) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निदेश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१३) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्दि. ह. कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/ अमरावती/औरंगाबाद.
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रे (पूर्व), मुंबई.
संबंधित संस्था

**प्रत माहितीसाठी**
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई २०.
निवड नस्ती / तांशि-५

True Copy

Principal
A. G. Patil Polytechnic Institute
Solapur.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | सध्या अस्तित्वात असलेले अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता २००९-१० | प्रवेशक्षमता २०१०-११ | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेले पत्र क्रमांक व दिनांक आणि मान्यतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४० | शांती एज्यु.सोसायटी ए.जी.पाटील पॉलि. इन्स्टि., १८/२ए२), प्रताप नगर, सारेगाव ता.नॉर्थ सोलापूर, सोलापूर | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० | एफ नं.२२-२७४९/२००८/(२२७/टिएमडीई-२७४९), दि.१९-६-२०१०, शै.व.२०१०-२०११ करीता |
| | | इले. अँड टेलि.कम्यु. इंजि. | ६० | ६० | |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | १२० | |
| | | सिव्हील इंजिनिअरींग | ० | ६० | |
| | एकूण | | २४० | ३६० | |
| ४१ | विद्यावर्धिनी चॅरिटेबल ट्रस्ट अभयसिंहराजे भोसले इन्स्टि.ऑफ टेक्नॉ., गेट नं.२८९, २८२, २९०, २९१, शेंद्रे, सातारा | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० | एफ नं.२२-२७२७/२००८/(२१९/टिएमडीई-२७२७), दि.१९-६-२०१०, शै.व.२०१०-२०११ करीता |
| | | इले. अँड टेलि.कम्यु. इंजि. | ६० | ६० | |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | १२० | १२० | |
| | एकूण | | ३०० | ३०० | |
| ४२ | संत गजानन महाराज रुरल हॉस्पीटल अँड रिसर्च सेंट, संत गजानन महाराज रुरल पॉलि., महागाव साईट, चिंचवाडी, गडहिंग्लज कोल्हापूर | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० | एफ नं.२२-२७२४/२००८/(२१६/टिएमडीई-२७२४), दि.१९-६-२०१०. |
| | | इले. अँड टेलि.कम्यु. इंजि. | ६० | ६० | |
| | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | १२० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० | ६० | |
| | | ऑटोमोबाईल इंजिनिअरींग | ० | ३० | |
| | एकूण | | ३०० | ३९० | |
| ४३ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टि. ऑफ इंजि. अँड टेक्नॉ., सर्व्हे नं.२११०, ई-वॉर्ड, कोल्हापूर ४१६००३ | ऑटोमोबाईल इंजिनिअरींग | ६० | ६० | एफ नं २२-२९०५/२००९/(२६३/टिएमडीई-२९०५), दि.१९-६-२०१०, शै.व.२०१०-२०११ करीता |
| | | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० | |
| | | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ० | ६० | |
| | | इले. अँड टेलि.कम्यु. इंजि. | ० | ६० | |
| | एकूण | | १८० | ३०० | |
| ४४ | डी.वाय.पाटील एज्यु. सोसायटी, डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजि.अँड पॉलि., सर्व्हे नं.८५, तालसंडे, कोल्हापूर ४१६११२ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० | ६० | एफ नं.२२-२९१८/२००९/(३०/टिएमडीई-२९१८), दि.१९-६-२०१०, शै.व.२०१०-२०११ करीता |
| | | इले. अँड टेलि.कम्यु. इंजि. | ६० | ६० | |
| | | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | १२० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ० | ६० | |
| | एकूण | | २४० | ३६० | |

True Copy



Principal
A. G. Patil Polytechnic Institute
Solapur.